जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2024
लोकमत

# बहुविद्याशाखीय संशोधनाचा अंगीकार करणे आवश्यक

## डॉ. नानासाहेब थोरात : विद्यापीठात व्याख्यान

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : विविध विद्याशाखांमधील संशोधकांनी सद्य:स्थितीत बहुविद्याशाखीय संशोधनाचा अंगीकार करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक, मेरी क्युरी फेलो आणि आयर्लंड येथील लिमरिक विद्यापीठातील सहयोगी प्राध्यापक डॉ. नानासाहेब थोरात यांनी शुक्रवारी केले.



शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात 'बहुविद्याशाखीय संशोधन कारकिर्दीच्या दिशा' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात डॉ. थोरात बोलत होते. अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे अध्यक्षस्थानी होते. डॉ. थोरात म्हणाले, विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपादनाच्या प्रक्रियेकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहायला हवे. विज्ञान विषयांइतकेच तत्त्वज्ञान आणि सामाजिकशास्त्रांतील ज्ञान व संशोधनही महत्त्वाचे आहे. एका विषयामध्ये तज्ज्ञ होणे गरजेचे आहेच; पण, अन्य विषयांमधील प्रवाह समजावून घेण्यास आणि बहुविध अवांतर वाचनासही प्राधान्य द्यावे. सर्वोत्कृष्टतेचा ध्यास बाळगून विविध विद्याशाखांमध्ये संयुक्त संशोधन सहकार्य वृद्धिंगत होणे आवश्यक आहे. त्या दृष्टीने बहुविद्याशाखीय अभ्यास व संशोधनाचे धोरण स्वीकारणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ. केशव राजपुरे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. एच. एम. यादव, डॉ. एस.पी. दास, डॉ. ए.आर. पाटील यांच्यासह अधिविभागातील विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी प्रास्ताविक केले. साधना परीट व साक्षी काळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एस. पाटील यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 JUL 2024
पुण्यनगरी

# बहुविद्याशाखीय संशोधनाचा अंगीकार आवश्यक : थोरात

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

विविध विद्या शाखांमधील संशोधकांनी सद्यस्थितीत बहुविद्याशाखीय संशोधनाचा अंगीकार करण्याची आवश्यकता आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय ख्यातीचे संशोधक, मेरी क्युरी फेलो आणि आयर्लंड येथील लिमरिक विद्यापीठातील सहयोगी प्रा. डॉ. नानासाहेब थोरात यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभागात 'बहुविद्याशाखीय संशोधन कारकिर्दीच्या दिशा' या विषयावर आयोजित विशेष व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी अधिविभागप्रमुख डॉ. राजेंद्र सोनकवडे होते.

डॉ. थोरात म्हणाले, विद्यार्थ्यांनी ज्ञानसंपादनाच्या प्रक्रियेकडे अधिक व्यापक दृष्टिकोनातून पाहायला हवे. विज्ञान विषयांइतकेच तत्त्वज्ञान आणि



सामाजिक शास्त्रांतील ज्ञान व संशोधनही महत्त्वाचे आहे. एका विषयामध्ये तज्ज्ञ होणे गरजेचे आहेच; पण अन्य विषयांमधील प्रवाह समजावून घेण्यास आणि बहुविध अवांतर वाचनासही प्राधान्य द्यावे.

यावेळी डॉ. केशव राजपुरे, डॉ. आर. एस. व्हटकर, डॉ. नीलेश तरवाळ, डॉ. एच. एम. यादव, डॉ. एस.पी. दास, डॉ. ए.आर. पाटील यांच्यासह अधिविभागातील विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. व्ही. एस. कुंभार यांनी प्रास्ताविक, साधना परीट व साक्षी काळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. एस. एस. पाटील यांनी आभार मानले.